महाराष्ट्र शासन

सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभागीय कार्यालय
पुणे-१
आवक क्र. 985
दिनांक 13 JUL 2007

क्रमांक : युएसजी २००३/(५०/०३)-विशि-४
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ६ जुलै, २००७.

प्रति,

कुलसचिव,
सर्व विद्यापीठे.

संचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य,
पुणे,

सर्व सह संचालक,
उच्च शिक्षण.

विषय :- पीएच्.डी. व एम्.फील. या शैक्षणिक अर्हतांना दिलेल्या स्थगितीबाबत.

संदर्भ :- १) विद्यापीठ अनुदान आयोगाची क्र.एफ.१-१/२००२(पी.एस.) एक्झम्पशन, दिनांक १४-६-२००६ ची अधिसूचना.
२) शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ५ सप्टेंबर, २००६ चे पत्र.

संदर्भीय अ.क्र.१ येथील अधिसूचनेन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट/सेट या शैक्षणिक अर्हतेबरोबरच एम.फील व पीएच.डी. या शैक्षणिक अर्हतांना अधिव्याख्याता पदावरील नियुक्तीसाठी मान्यता दिली. त्यानुसार राज्य शासनाने संदर्भीय अ.क्र.२ येथील दि.५ सप्टेंबर, २००६ चे पत्रान्वये अधिव्याख्याता पदावरील नियुक्तीसाठी एम.फील. व पीएच.डी. या शैक्षणिक अर्हता लागू केल्या, तथापि, नेट/सेट शैक्षणिक अर्हताधारकांपैकी श्री. भूपेश मारुतराव मुडे व इतर या अधिव्याख्यात्यांनी याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई नागपूर खंडपीठ येथे याचिका क्र.४२६६/०६ अन्वये याचिका दाखल करुन पीएच.डी व एम.फील या शैक्षणिक अर्हता रद्द

करण्याबाबत न्यायालयास विनंती केली. त्यानुसार मा. उच्च न्यायालयाने दि.६-३-२००७ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि.१४ जून, २००६ च्या अधिसूचनेस व त्यानुसार संदर्भीय अ.क्र.२ येथील दि.५-९-२००६ च्या पत्रास स्थगिती दिली आहे. तरी दि.५-९-२००६ च्या शासन पत्रास पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती देण्यात येत आहे.

(श. स. अटक)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

जावक/१/ ४३१८/मदे. ११/७/०७.

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
म. रा. पुणे.

सर्व सहसंचालक (उच्च शिक्षण).

या पत्राच्या प्रती सर्व अशासकीय महाविद्यालयास पाठवाव्यात व त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.